महा मेट्रो
PUNE METRO
Helpline No.
18002705501

# मेट्रो प्रकल्पाच्या पहिल्या सेगमेंटची महामेट्रोकडून उभारणी



पिंपरी – चिंचवड महानगरपालिका ते रेंज हिल मार्गिके दरम्यान आज उभारण्यात आली पहिली सेगमेंट

पुणे, दि. १४ डिसेंबर, २०१७ : महामेट्रोच्या वतीने पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरात मेट्रो प्रकल्पाचे काम वेगात सुरू असून पिंपरी – चिंचवड महानगरपालिका ते रेंज हिल (११. ५७ किमी) या मार्गिके दरम्यान आज पहिल्या सेगमेंटची उभारणी करण्यात आली आहे.

सदर मार्गिकेदरम्यान खराळवाडी येथे पिलर ३४९ ते पिलर ३४८ दरम्यान आज सकाळी ग्राउंड लाँचिंग सिस्टिम्सच्या मदतीने या सेंगमेंटची उभारणी करण्यात आली आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरात होत असलेल्या मेट्रो प्रकल्पातील हा पहिलाच सेंगमेंट आहे हे विशेष.

दोन पिलर मधील लांबी अथवा स्पॅन हा २८ मी असतो आणि प्रत्येक स्पॅनच्या एन्डला एन्ड सेगमेंट असतात. त्यापैकीचा एक एन्ड सेगमेंट आज उभारण्यात आला आहे. आता पर्यंत सदर मार्गिकेवर ५४ फूटिंग्स, १६ पिअर्स, ५ पिअर विथ पिअर कॅप्स आणि ४९ सेगमेंट तयार करण्यात आले आहेत.

